महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युतपारेषणकंपनीमर्यादित
सी.आय.एन.क्र.यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४६
अधिक्षकअभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकामनिसुव्यवस्थाप्रविभाग,
म.रा.वि. पारेषणकंपनीमर्यादितनागपूरयांचे कार्यालय

---

अअस्था/अउदा/स्था/बांध/नि. सुव्यवस्था/प्रविभाग/नाग/तांत्रिकं/167 दिनांक: 16.02.2023

**विषय:-** सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांना लॉटरी पध्दघतीने कामे वाटप करण्यासंबंधी व्दितीय लॉटरी (२०२२–२३) बैठक दि. २३.०२.२०२३ (गुरूवार) ला घेणे बाबत.

**संदर्भ:-** १) I, E & L Dept. GoM GR No. Misc-2015/CR-63/Energy-5 Dt. 26/03/2015.
२) MSETCL/CO/Tr. O&M/SE-II/EE-VIII/12883 Dt. 05/12/2016.
३) C.O letter vide no. 1046 dt.25.01.2018.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क.(१)अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क. (2) अन्वये लागू केली आहे.

सदर परिपत्रकाला अनुसरून अधिक्षक अभियंता (स्था) अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित नागपूर या कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांची नोदणी सुरू आहे.

सदरील नोटीस हि दि. १६.०२.२०२३ (गुरूवार) रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून, प्रसिध्दीच्या दिनांकापासून २३.०२.२०२३ (गुरूवार) पर्यत महापारेषण कंपनीच्या संकेत स्थळावर तसेच अऊदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था प्रविभाग, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित नागपूरया कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीस्तव उपलब्ध असेल.

या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता (स्था) अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित नागपूर या कार्यालयात दि. २३.०२.२०२३(गुरूवार )रोजी खालील कामांसाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून व्दितीय (२०२२–२३) लॉटरी बैठक आयोजित करण्यात येत आहे.

| अ. क | कामाचे नांव | रक्कम(सर्व करासहित) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १) | Providing false ceiling, partition on wall, grill to windows of extended control room & metal spreading in switchyard at 220 KV S/Stn Sunflag Bhandara, Dist. Bhandara | 9,45,364.00 | Bhandara |
| 2) | Various civil maintenance work at 132KV S/Stn Lakhandur Dist. Bhandara. | 5,76,922.00 | Bhandara |

**अटी व शर्ती :-**

१)सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहतांना खालील तपशील सोबत आणणे बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची स्थापत्य कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.

ब. सर्व शासकीय/निमशासकीय/खजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.

क.रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे.

२) अधिक्षक अभियंता (स्था) अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित नागपूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील **भंडारा** जिल्हयात रहिवासी असलेल्या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनाच या लॉटरीमध्ये भाग घेता येईल

३) लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर स्थापत्य अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणी कृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेतंर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रीयेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४) या लॉटरी प्रक्रीयेसाठी अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित नागपूर या कार्यालयात दि. १५.०२.२०२३ पर्यंत नोदणी झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक दि.२३.०२.२०२३(गुरुवार) रोजी दुपारी १२:३० वाजता अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग, विद्युत भवन, दुसरा माळा, काटोल रोड म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित नागपूर या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांना आव्हान करण्यात येते की, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्राच्या सत्य प्रतसोबत या कार्यालयात उपस्थित राहावे.

(प्रविण पिल्लेवान)
**अधिक्षक अभियंता (स्था) (प्रभारी)**
**अऊदा स्था. बांध. निसुव्यवस्था प्रविभाग, नागपूर**

**प्रत सादर :–**

१. कार्यकारी अभियंता अऊदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था विभाग, नागपूर म.रा.वि. पारेषण कंपनी
   - आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्या सोबत नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित राहावे.

२. व्यवस्थापक (विवले) अऊदा स्था. बांध. निसुव्यवस्था प्रविभाग,नागपूर
   - आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यासोबत नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित राहावे.

३. नोटीस बोर्ड